Vol II Issue IX

ISSN No : 2230-7850

Monthly Multidisciplinary Research Journal

# *Indian Streams Research Journal*

Executive Editor

Ashok Yakkaldevi

Editor-in-chief

H.N.Jagtap

## Welcome to ISRJ

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.


## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya [ Malaysia ]

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus Pop

Mohammad Hailat
Dept. of Mathmatical Sciences, University of South Carolina Aiken, Aiken SC 29801

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Department of Chemistry, Lahore University of Management Sciences [ PK ]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

Nawab Ali Khan
College of Business Administration

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University, Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU, Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Ph.D , Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra


**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Indian Streams Research Journal
Volume 2, Issue.11,Dec. 2012
ISSN:-2230-7850
Available online at www.isrj.net

ORIGINAL ARTICLE

# *ललितगद्य व वैचारिक लेखन : काही विचार*

संभाजी मलघे

इंद्रायणी महाविद्यालय,
तळेगाव दाभाडे

***प्रस्तावना :–***

1926–27 च्या सुमारास ललित लेखन हा वाङ्मयप्रकार उदयास आलेला दिसतो. आजच्या 'ललितगद्य' या संज्ञेमध्ये लघुनिबंध, गुजगोश्टी, ललित निबंध, ललित लेख, आठवणी, व्यक्तिचित्रे, प्रवासवर्णन अशा वाङ्मयप्रकारांचा समावेश होतो.

ललित गद्य :–

1580 च्या दरम्यान वैचारिक निबंधापेक्षा स्वतंत्र असा वाङ्मयप्रकार असल्याचे लक्षात आले. या संदर्भत वाङ्मयीन संज्ञा संकल्पना कोशामध्ये आलेले विवेचन लक्षात घेता येईल. ते असेः ''लघुनिबंध हा वैचारिक निबंधापेक्षा स्वतंत्र वाङ्मयप्रकार म्हणून प्रथम फ्रेंच लेखक मॉंतेन याने इ. स. 1580 च्या सुमारास रूढ केला. त्यासाठी मॉंतेनने 'एसाय' ही संज्ञा वापरली. या निबंधप्रकारात आत्मनिष्ठ अनुभवांना प्राधान्य असते. इंग्रजीतील बेकेनप्रणीत 'एसे' किंवा निबंध यात विचारांची वस्तुनिष्ठ मांडणी असते. अनुभव आलाच तर त्यांचे स्वरूप साधनरूप असते. लघुनिबंधात माझ्या लेखनाचा विशय 'मी' ही भूमिका असते. त्यात अनुभवदर्शन व विचार यांचे मुक्त आविष्करण असते. चार्लस् लॅम्ब याने 1820 च्या सुमाराला 'पर्सनल एसे' ही अधिक अन्वयार्थक संज्ञा योजून या प्रकाराच्या निबंधाचा कल विचारांपेक्षा आत्मनिष्ठ चिंतनाकडे असल्याचे स्पष्ट केले. जॉन्सनने या प्रकारच्या लेखनाचे वर्णन 'मनाची स्वैर क्रीडा' या शब्दांत केले आहे. मराठीत 1930 च्या सुमाराला ना. सी. फडके यानी 'पर्सनल एसे' च्या धर्तीवर निबंध लिहिले व त्याचे 'गुजगोष्टी' असे नामकरण केले. पुढे वि. स. खांडेकर, अनंत काणेकर यांनी 'लघुनिबंध' लिहिले. 1950 नंतर 'नवसाहित्य'च्या कालखंडात 'लघुनिबंध' हे नाव मागे पडून अधिक आत्मनिष्ठ, अधिक मुक्त, लवचिक, काव्यात्म, तरल, प्रतिमांनी समृद्ध व चिंतनशील अशा स्वरूपाचे 'ललितगद्य' लिहिले जाऊ लागले. इरावती कर्वे, दुर्गा भागवत, गो. वि. करंदीकर, प्राणहिता, श्रीनिवास विनायक कुलकर्णी यांनी ललित निबंधाची कक्षा व्यापक केली. त्यांचे गद्यलेखन 'ललितलेख' या नावाने ओळखू जाऊ लागले.''1 या सर्व विवेचनामधून अतिशय अन्वयार्थकपणे ललितगद्याचा इतिहास दिसतो. वैचारिक लेखनापेक्षा वेगळे असलेले लेखन आत्मनिष्ठ असते. 'मी'चा अविश्कार त्यात असतो. गतकालीन जीवनातील आठवणी सांगणे या प्रक्रियेतून 'मी'ला स्वतःचे विश्लेशण करण्याची संधी मिळत असते. या संदर्भात डॉ. आनंद यादव म्हणतात, ''लघुनिबंधात 'मी' त्यचा आविष्कार असतो. एखाद्या चिंतनाच्या, भावावस्थेच्या, वस्तूच्या, समानतेच्या, सूत्रानुशंगाने 'मी'चा अनुभव अगर अनुभवगुच्छ लघुनिबंधात व्यक्त होत असतो.''2 यादवांच्या या मतावरून किंवा वरील मतांवरून असे म्हणता येईल की 'ललितगद्य' हा 'मी'त्वाचाच आविश्कार असतो. किंबहुना 'स्व'त्वचा, 'मी'त्वचा होणारा सुंदर संवाद म्हणजे 'ललितगद्य' होय. या संदर्भात डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांचे मत चिंतनीय असेच आहे. ते म्हणतात,

''अशा प्रकारचे लेखन आत्मकथनाच्या फार जवळ जाणारे असते. क्वचित कवितेच्याही जवळ जाणारे असते. मुक्त आविष्कारामुळे विचारही प्रकट करता येतात. विशेश म्हणजे, हा वाचकांसी होणारा जिवंत संवाद असतो. असा संवाद साधता–साधता लेखक स्वतःशीच बोलायला लागतो आणि अत्यंत महत्त्वाचे म्हणजे, तो मोकळा होत जातो! रितं होणं, मोकळं होणं ही साऱ्याच लेखकांची गरज असते.''3 कोत्तापल्ले यांचे हे विचार 'ललितगद्य' वाङ्मयप्रकारावर मार्मिकपणे भाष्य करणारे आहेत.

थोडक्यात, 'मी'ची भूमिका महत्त्वाची असलेला हा वाङ्मयप्रकार आज पूर्णपणे रूढ झालेला आहे असे दिसते.

'लघुनिबंध' लेखनाची सुरुवात 1926–27 च्या सुमारास झाली. या काळात ना. सी. फडके, वि. स. खांडेकर यांनी या प्रकारचे लेखन केले. फडक्यांनी 'पर्सनल एसे'चे अनुकरण करून 'गुजगोष्टी' च्या रूपाने केलेले लेखन 'लघुनिबंध' स्वरूपाचे होते. फडक्यांचा निबंध अनुकरणातून आला असल्यामुळे मराठी जातकुळीचा निबंध सर्वप्रथम खांडेकरांनी लिहिलेला दिसतो. त्यामुळे ''मराठी लघुनिबंधाचे जनक म्हणून वि. स. खांडेकर, तर प्रवर्तक म्हणून ना. सी. फडके यांना मान्यता द्यावी लागते.''4

फउके, खांडेकरांनंतर हरिभाऊ आपटे, शि. प. परांजपे, राम गणेश गडकरी यांनी अशा प्रकारचे लेखन केले. या सर्व लेखनामधील 'मी'त्वाचे संस्कार अव्वल दर्जाचे होते. या काळाच्या आसपास गं. भा. निरंतर, कुसुमावती देशपांडे ना. मा. संत यांचे लेखन वैशिष्ट्यपूर्ण ठरले. गं. भा. निरंतरांनी पूर्वीची चौकट मोडून गंभीर व अंतर्मुख करणारे आणि 'मी'च्या व्यक्तिमत्त्वाचे सखोल दर्शन घडविले. त्यांची 'साखरझोप' (1938) व 'नवी साखरझोप' (1948) ही पुस्तके या दृष्टीने महत्त्वाची ठरली कुसुमावतीबाईंनी निसर्गाच्या आकलनातून 'मी'चा सूचक आविष्कार घडविला. ना. मा. संतांनी 'उघडे लिफाफे' (1949) यासारखे लेखन करुन फडकेप्रणित तंत्रामधून लघुनिबंधाला बाहेर काढण्याचा प्रयत्न केला. याच काळात

वि. पां. दांडेकरांचेही लेखन झालेले दिसते.

1949–50 मध्ये इरावती कर्वे, दुर्गा भागवत, गो. वि. करंदीकर, म. ना. अदवंत, भगवंत देशमुख, श्रीपाद जोशी, सरोजिनी बाबर यांचे लेखन उल्लेखनीय ठरले. इरावती कर्वे यांनी जुन्यातून यशस्वीपणे बाहेर पडून वेगळे कौटुंबिक, सामाजिक, जगभरातील प्रवासाच्या जोरकस अनुभवांचे दर्शन 'परिपूर्ती' (1949), 'भोवरा' (1960) मधून घडविले. दुर्गाबाईंनीही 'भावमुद्रे'मधून (1968) आपले अनुभव अधिकाधिक आत्मनिष्ठेतून मांडले. या दोघींनी मराठी ललित लेखनाला सौष्ठव प्राप्त करून दिले. गो. वि. करंदीकरांचे 'स्पर्शाची पालवी' (1958) आणि 'आकाशाचा अर्थ' (1965) मधील लेखन वैविध्यपूर्ण आहे. 'मी'ची विचारशील वृत्ती, विचारांतील सूक्ष्मता, गुंतागुंत त्यांनी समर्थपणे उलगडून दाखवली. त्यामुळे त्यांचे लेखन वैशिष्ट्यपूर्ण ठरले.

1960 नंतर मंगेश पाडगावकर, श्रीनिवास कुलकर्णी, माधव आचवल, मधुकर केचे, विजय तेंडुलकर, व्यंकटेश माडगूळकर, सरोजिनी वैद्य यांच्याबरोबर ग्रामीण 'ललितगद्य' आनंद यादव, चंद्रकुमार नलगे यांच्या रूपाने आलेले दिसते.

मंगेश पाडगावकरांच्या 'निंबोणीच्या झाडामागे' (1956) मधील संवेदनशील कवीने 'मी' च्या रूपात टिपलेले अनुभव अनोखे वाटतात. श्रीनिवास कुलकर्णी 'डोह' (1961) मधून बाल 'मी' चा सूक्ष्मपणे वेध घेतात. तर माधव आचवल यांच्या 'किमया' (1961) च्या स्वरूपात वास्तूकलेतील तज्ज्ञाचे दर्शन घडते. लोकविलक्षण व्यक्तिमत्त्वाचा आविष्कार यातून झाला आहे. मधूकर केचे 'आखर अंगण' (1967) मधून अधिक मुक्तपणे आविष्कृत होत जातात. त्याचबरोबर विजय तेंडुलकरांचे 'कोवळी उन्हे' (1971), सरोजनी वैद्य यांचे 'पहाटपाणी' (1975), माडगूळकरांचे 'पांढऱ्यावर काळे' (1975), आनंद यादवांचे 'स्पर्शकमळे' (1971) इत्यादी लेखन वैशिष्ट्यपूर्ण ठरले.

1980 नंतरच्या दशकात अनंतराव पाटील 'झडीचे दिवस' (1981), अनिल अवचट यांचे 'माणसं' (1980), तसेच वसुंधरा पटवर्धन, देवीदास बागूल, शिरीश पै, द. भि. कुलकर्णी, वामन इंगळे, सुरेश मथुरे, सुधा नरवणे, विजया राजाध्यक्ष इत्यादींनी महत्त्वपूर्ण असे लेखन केलेले दिसते.

वैचारिक लेखन :–

आजचे वैचारिक लेखन म्हणून ते लेखन गणले जाते, ते पूर्वीच्या वैचारिक निबंधाचा एक भाग असल्याचे दिसते. वैचारिकतेचे भक्कम अधिष्ठान असलेले हे लेखन वाचकाला विचारप्रवृत्त करायला लावण्याचा हेतूने लिहिले जात असते. किंबहुना वाचकांच्या जीवनदृष्टीमध्ये प्रगल्भता आणून देण्याचे कार्य हे लेखन करीत असते. या संदर्भात डॉ. निर्मलकुमार फडकुले म्हणतात, ''विचारांचे वेगवेगळे पैलू प्रकट करून वाचकांच्या जीवनदृष्टीला प्रगल्भता आणण्यासाठी, निदान त्यांना विचार प्रवृत्त करण्यासाठी निर्माण झालेला हा वाङ्‌मयप्रकार आहे.''5 फडकुले यांचे हे मत या वाङ्‌मयप्रकाराची एका अर्थाने व्याख्या सांगणारे सार्थ असेच आहे. अशा या वैचारिक लेखनाच्या पार्श्वभूमीचा नामोल्लेख स्वरूपाचा विचार करू.

वैचारिक निबंध म्हणून ओळखले जाणारे हे लेखन 1918 च्या सुमारास लोकहितवादी आणि विश्णूशास्त्री चिपळूणकरांपासून सुरू झालेले दिसते. पुढे लोकमान्य टिळक, सावरकर, विनोबा भावे, गोपाळ गणेश आगरकर, म. फुले, वि. का. राजवाडे, शि. म. परांजपे अच्युतराव कोल्हटकर, श्री. म. माटे, द. वा. पोतदार, आचार्य जावडेकर, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, बाळशास्त्री जांबेकर, भाऊ महाजन, बाबा पदमनजी, रा. भि. गुंजीकर असे अनेक निबंधकार 1818 ते 1940 पर्यंतच्या या कालखंडात वैशिष्ट्यपूर्ण असे लेखन करताना दिसतात.

स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये गं. बा. सरदार, पु. ग. सहस्त्रबुद्धे, ना. ग. गोरे, दि. के. बेडकेर, गोविंद तळवळकर, राजा पणशीकर, य. दि. फडके, भा. ल. भोळे, राम शेवाळकर, प्रो. मे. पु. रेगे, ना. भि. परुळेकर, पा. वां. गाडगीळ, जयवंतराव टिळक, अनंत भालेराव, माधव गडकरी, इत्यादी अनेक लेखकांनी चांगल्या प्रकारचे वैचारिक लेखन केलेले दिसते.

एकंदरीत वैचारिक लेखनाची प्रदीर्घ अशी परंपरा मराठी लेखनामध्ये दिसते. मोठया प्रमाणात विचारमंथन या प्रकारातून झालेले आहे.

समारोप :–

ललितगद्य व वैचारिक लेखन यासंबधीचा विचार प्रस्तुत लेखामधून मांडला आहे. 1926–27 च्या सुमारास उदयास आलेल्या ललितगद्य हा वाङ्‌मयप्रकार स्थिरावला आहे. या लेखनाने मराठी लेखनात मोलाची भर घातली आहे. वैचारिक निबंध लेखन देखील 1818 पासून आजतागायत सुरू आहे. या लेखनाने मराठी साहित्याची कक्षा विस्तारण्याचे कार्य केले.

संदर्भ :–

1.गणोरकर प्रभा, डहाके वसंत आबाजी आणि इतर (संपा.) 'वाङ्‌मयीन संज्ञा संकल्पना कोश', पा. ना. बनहट्टी प्रकाशन, प्र. आ. 2001, पृ. 337–38
2. जोशी लक्ष्मणशास्त्री 'मराठी विश्वकोश खंड–12,' ललितगद्य, आनंद यादव, मराठी विश्वकोश मंडळ प्रकाशन, प्र. आ. 1985, पृ. 1244–45
3. कोत्तापल्ले नागनाथ, 'उद्याच्या सुंदर दिवसांसाठी,' मेहता पब्लिशिंग हाऊस प्र. आ. 2000, संवादापूर्वी थोडेसे
4.जोशी लक्ष्मणशास्त्री 'मराठी विश्वकोश खंड–12,' ललितगद्य, आनंद यादव, मराठी विश्वकोश मंडळ प्रकाशन, प्र. आ. 1985, पृ. 1244–45
5. फडकुले निर्मलकुमार, 'स्वातंत्र्योत्तर काळातील वैचारिक निबंध,' प्रदक्षिणा खंड दुसरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुनर्मुद्रण आवृत्ती, 2000, पृ. 272

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium     Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net